# तालिबान, अमेरिका करारामुळे भारताच्या सुरक्षा आव्हांनात वाढ

## तालिबान अमेरिका शांततेचा करार

अफगाणिस्तानातील तालिबान आणि अमेरिका यांच्यात २९ फेब्रुवारीला दोहा येथे शांततेचा करार झाला. सर्व प्रसिद्धी माध्यमांतून या कराराचे स्वागत झाले. अफगाणिस्तान अमेरिका कराराचे आपल्या दृष्टीने काय महत्त्व आहे? आपल्यावर त्याचे कोणते परिणाम होतील किंवा होणार आहेत? हा आपल्या दृष्टीने सर्वाधिक महत्त्वाचा विषय आहे. अफगाणिस्तानातील युद्धाला आता जवळजवळ ४० वर्षे झाली आहेत. १९७८ साली प्रथम रशिया अफगाणिस्तानात घुसला.१९९०च्या सुमारास रशिया अफगाणिस्तानातून बाहेर पडला.  २००१च्या अमेरिकेवरील दहशतवादी हल्ल्यानंतर अमेरिकेने अफगाणिस्तानवर हल्ला केला. त्यानंतर अफगाणिस्तानात गृहयुद्ध सुरू झाले.

शेवटी कट्टरपंथी इस्लामी तालिबानींनी सत्ता आपल्या हातात घेतली. त्यांनी जगभर जिहाद सुरू केला. त्याचा एक भाग म्हणून अमेरिकेवर २००१ला दहशतवादी हल्ला केला. ओसामा बीन लादेन या हल्ल्याचा मास्टर माईंड होता. २०१२ साली अमेरिकेने त्याला पाकिस्तानात घुसून ठार केले. अशा प्रकारे अफगाणिस्तान ४० वर्षे सतत हिंसाचारात गुंतलेला आहे. रशियाशी लढण्यासाठी कट्टर जिहादी तालिबानी, पाकिस्तानच्या मदतीने अमेरिकेनेच तयार केले. अमेरिकेच्या दृष्टीने ते आता भस्मासूर झाले आहेत. या तालिबानींवर पाकिस्तानचा फार मोठा प्रभाव आहे. ती त्यांची अनधिकृत सेना आणी सर्वात मोठे शस्त्र आहे. त्या सर्वांना सुरक्षित ठेवण्याचे काम पाकिस्तानने आतापर्यंत केले. तालिबानींना खतम करण्यासाठी अमेरिकेने प्रचंड मदत केली. मात्र पाकिस्तानने ही मदत तालिबानींना वाचविण्यासाठी केली.

अफगाणिस्तानातील सेनाधिकार्यांना भारतात प्रशिक्षण देण्यात येते. तेथील सरकारशी आपले चांगले संबंध आहेत. तरीही या शांतता करारात आपण नव्हतो.अफगाणिस्तानात एकाच वेळी अशरफ घनी आणि अब्दुला अब्दुला यांचे राज्य आहे. अशरफ घनी राष्ट्रध्यक्ष आहेत. अमेरिकेने तालिबानींशी जो करार केला, त्यात कैदेतील तालिबानींना सोडण्याचा विषय आहे. घनी म्हणतात की, आम्ही एकाही तालिबानीला सोडणार नाही. शांततेचा करार झाल्यानंतर चारच दिवसांत तालिबानींनी घनी-अब्दुला सरकारच्या सैन्यदलावर हल्ला केला. याचा अर्थ असा झाला की, शांततेच्या करारावरील शाई वाळण्यापूर्वीच तो करार मोडला गेला.

अमेरिकेचे सुमारे १३ हजार सैनिक अफगाणिस्तानात आहेत. ते अफगाणिस्तानातून परत जातील. त्यामुळे तेथे तालिबानी काबुलवर कब्जा मिळवतील. जागतिक शांततेवर जे काही परिणाम होतील त्याची चिंता करण्यास जग समर्थ आहे. याचे भारतावर काय परिणाम होतील, आणी त्याला कसे सामोरे जायचे हे जास्त महत्वाचे आहे.

पाकिस्तान बरोबर अफगाणिस्तान हा जगभर दहशतवादाची निर्यात करणारा कारखानाच आहे. हजारो दहशतवादी तेथे तयार होतात.

**<u>अफगाणिस्तानशी मैत्री आपले धोरण</u>**

अफगाणिस्तानात स्थिर सरकार येणे, जितके अफगाणिस्तानला आवश्यक आहे, तितकेच ते भारतालाही आवश्यक आहे. तालिबानशी मैत्री, हेच आपले धोरण असले पाहिजे.

मौलाना मसुद अजहर हा जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेचा म्होरक्या आहे. तो भारताच्या कैदेत होता. त्याची सुटका करण्यासाठी ‘इंडियन एअर लाईन्स’चे विमान पळविण्यात आले. प्रवाशांना बदल्यात तेव्हाच्या सरकारने मसुद अजहर

याला सोडले. त्याची संघटना भयानक दहशतवादी संघटना आहे. तालिबानींशी त्याचे संबंध जिव्हाळ्याचे आहेत.

पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय दडपणामुळे हाफीज सईदला अटक केली. परंतु, अजहर मसुदला अटक केली नाही. त्याला भूमिगत होऊ दिले. याचे कारण असे की, अफगाणिस्तानातील तालिबानींशी संवाद म्हणून अजहर मसुदचा पाकिस्ताला उपयोग आहे. अजहर मसुद भारताचा कट्टर दुश्मन आहे.

**इस्लामी कट्टरपंथी आणी काश्मीर खोरे**

काश्मीरचे मुख्य आव्हान इस्लामी कट्टरपंथी आहे. त्या सर्वांचे धागेदोरे अजहर मसुद आणि तालिबानी यांच्यापर्यंत पोहोचले आहेत. अफगाणिस्तानात तालिबानी सशक्त होणार म्हणजे भारतापुढे सुरक्षेचे अनेक प्रश्न निर्माण होणे आहे. भारताचा इतिहास जर पाहिला तर भारतावर जी आक्रमणे झाली, ती सर्व अफगाणिस्तानच्या मार्गाने गेली ८०० वर्षे झाली आहेत. आपल्या रक्षणासाठी देशाने एकत्र होउन जागे राहिले पाहिजे पण आपण फ़क्त आपआपसात भांड्ण्यात गुंतलो आहोत.

अफगाणिस्तानात आपण खूप आर्थिक गुंतवणूक केली आहे. इंग्रजांचे भारतात राज्य असताना भारत सुरक्षित राहावा म्हणून इंग्रजांनी अफगाणिस्तानात जाऊन तीन युद्धे केली आहेत. मग भारताने काय केले पाहिजे?.

अमेरिकी माघारीनंतर अल कायदा आणि इस्लामिक स्टेट यासारख्या दहशतवादी गटांना थांबवण्याची तालिबानची क्षमता नाही. तालिबान लष्करे तैयब्बा आणि जैशे महंमद या दहशतवादी संघटनांना मोकळीक देईल. भारताच्या करारामुळे काही अपेक्षा आहेत. प्रथम करारात अफगाण जनतेच्या सर्व गटांच्या अपेक्षांचा समावेश असला पाहिजे. मात्र, गैर-पश्तून जमातींच्या गरजांना महत्त्व दिलेले नाही. भारताला वाटते की भारतविरोधी गटांना आश्रय किंवा अप्रत्यक्ष मदत नसावी. तालिबानचे

भारताशी सख्य नाही आणि पाकिस्तान तालिबानी दहशतवादी भारतात घुसवेल.म्हणजे अमेरिकेच्या माघारीनंतर तालीबान उग्रवाद आणी पर्यायाने भारता विरोधात दहशतवादी कारवाया वाढवेल.

**<u>अफगाणिस्तानमधील हितसंबंध सुरक्षित ठेवा</u>**

मात्र अफगाणिस्तानमध्ये भारताचे मित्रगट पण आहेत. पूर्वी भारताने अहमद शाह मसूद याच्या नॉर्दर्न अलायन्सला मदत करण्यासाठी ताजिकिस्तानच्या दक्षिणी सीमेवर हवाई तळ आणि रुग्णालय स्थापन केले होते. ते पुन्हा कार्यान्वित करावे.

भारताचे अफगाणिस्तानशी ऐतिहासिक काळापासून संबंध आहेत. तालिबान राजवटीचा अपवाद वगळता स्वातंत्र्यानंतरही हे संबंध चांगले राहिले आहेत. ९/११ नंतर भारताने अफगाणिस्तानमध्ये धरण बांधणी, विद्युत निर्मिती प्रकल्प, रस्ते ते संसद भवन अशा प्रकल्पांसाठी सुमारे ३ अब्ज डॉलरची गुंतवणूक केली आहे. लाखो अफगाण तरुणांना प्रशिक्षित केले असून दरवर्षी उच्च शिक्षणासाठी भारतात येणार्या हजारो विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या दिल्या आहेत.आपले गुप्तहेर खाते अजुन मजबुत करावे व परिस्थितीवर लक्ष ठेवावे.

आपण अफगाणिस्तानच्या माध्यमातून पाकिस्तानमधील फुटीरतावाद्यांना मदत करू शकतो. डिसेंबर 1971 मध्ये बांगलादेशचा जन्म झाल्यापासून पाकिस्तानला भारताची फार भीती वाटते. जर भारताने पाकिस्तानवर हल्ला केला तर पाकिस्तानला माघार घेण्यासाठी अफगाणिस्तानशिवाय पर्याय नाही. म्हणुन अफगाणिस्तानात पाकिस्तानशी मैत्री असलेलेच सरकार सत्तेत असले पाहिजे ही पाकिस्तानची सामरिक निती आहे. भारतियांनी सैन्याच्या मागे एकत्रित उभे राहुन आपली संरक्षण व्यवस्था मजबुत करावी व सर्व प्रकारच्या आव्हांनाना तोंड देण्यास तयार रहावे.